आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.००वाजता

७ डिसेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- राज्य विधिमंडळाच्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनात १७३ सदस्यांच्या शपथविधीनंतर कामकाज स्थगित, अध्यक्षांची निवड येत्या सोमवारी

- यंत्राद्वारे मतदान प्रक्रियेला विरोध दर्शवत महाविकास आघाडीच्या आमदारांचा शपथविधीवर बहिष्कार

- देशव्यापी क्षयरोग निर्मूलन अभियानाचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते उद्घाटन

- सक्तवसुली संचालनालयाचे अहमदाबाद आणि मुंबईत ७ ठिकाणांवर छापे, साडे तेरा कोटी रुपयांची रोख रक्कम जप्त

- पहिलं बालरंगभूमी संमेलन २०,२१,२२ डिसेंबर रोजी पुण्यात होणार

**आणि**

- बॉर्डर-गावस्कर चषक मालिकेच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाची भारतावर आतापर्यंत १५७ धावांची आघाडी.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाचा आज पहिला दिवस होता. विधानसभेचे तात्पुरते अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी कामकाजाला सुरुवात केली. विधानसभेच्या अध्यक्षांची निवड येत्या ९ तारखेला होणार असून यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याची वेळ रविवारी दुपारी बारा

वाजेपर्यंत ठरवण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली. यानंतर चैनसुख संचेती, जयकुमार रावल, माणिकराव कोकाटे आणि आशीष जयस्वाल या सदस्यांना शपथ देण्यात आली. हे चौघे कोळंबकर यांच्यासोबत तालिका सदस्य म्हणून कामकाज पाहतील. त्यापाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना आमदारकीची शपथ देण्यात आली. इतर आमदारांच्या शपथविधीनंतर सभागृहाचं आजचं कामकाज तहकूब झालं. उद्या उर्वरित नवनिर्वाचित आमदारांना शपथ देण्यात येईल.

**<><><><><>**

दरम्यान, ईव्हीएमद्वारे मतदान प्रक्रियेला विरोध म्हणून विरोधी पक्षांच्या नवनिर्वाचित आमदारांनी शपथविधीवर बहिष्कार टाकला. समाजवादी पक्ष आणि इतर छोट्या पक्षांचे चार आमदार वगळता विरोधी बाकांवरच्या आमदारांनी शपथ घेतली नाही. महायुती निवडणुकीत गैरप्रकार करून सत्तेवर आल्याची राज्यातल्या बहुतांश जनतेची भावना आहे, या भावनेचा आदर करून महाविकास आघाडीच्या आमदारांनी शपथ न घेण्याचा निर्णय घेतल्याचं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. सोलापूर जिल्ह्यातल्या मारकडवाडीतली ईव्हीएमविरोधातली लढाई काँग्रेस देशभरात पोहोचवणार असल्याचंही पटोले म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी याबाबतची भूमिका स्पष्ट करताना सांगितलं,

**बाईट- आदित्य ठाकरे**

भाजपाचे आमदार आणि विधानसभेचे माजी अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधकांच्या या भूमिकेचा निषेध केला. ते म्हणाले......

**बाईट - नार्वेकर**

**<><><><><>**

देशातला इलेक्ट्रिक वाहन उद्योग २०३० पर्यंत सुमारे ४ कोटी रोजगार निर्माण करणारं क्षेत्र बनेल, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते आज नागपूरमध्ये राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालयात 'इलेक्ट्रिक वाहनातल्या आगीच्या दुर्घटनांचं व्यवस्थापन' या विषयावरच्या कार्यशाळेत बोलत होते. इलेक्ट्रिक दुचाकींना लागणाऱ्या आगीच्या घटना टाळण्यासाठी डीआरडीओ आणि आयआयटीमधल्या तज्ज्ञांच्या समितीनं संशोधन केलं असून एआयएस या सुरक्षा मानांकनानं बॅटरी सुरक्षा सुनिश्चित केली असल्याचं त्यांनी सांगितलं. इलेक्ट्रिक बसेसमध्ये आगीची सूचना देणारी घंटा लावणं अनिवार्य केलं असल्याचं त्यांनी सांगितलं. जम्मूमध्ये मोठ्या प्रमाणात सापडलेल्या लिथियमच्या साठ्यांमुळे लिथियम आयन बॅटरीची किंमत कमी होईल, असंही ते म्हणाले .

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत विविध शेतकरी संघटना आणि आघाडीच्या कृषी अर्थतज्ज्ञांशी अर्थसंकल्पपूर्व दुसरी बैठक झाली. या बैठकीला अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव उपस्थित होते.

**<><><><><>**

देशव्यापी क्षयरोग निर्मूलन अभियानाला आज केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते हरयाणात पंचकुला इथं प्रारंभ झाला. देशातली ३३ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांतल्या मिळून ३४७ जिल्ह्यांत आजपासून १०० दिवस ही मोहिम राबवली जाणार आहे. यात क्षयरोगाविषयी जनजागृती करणं आणि क्षयरोगाबद्दलच्या गैरसमजुती दूर करणं यांचा समावेश आहे.

२०२५ पर्यंत देश क्षयरोगमुक्त करण्यासाठी कोणतीही कसर सोडली जाणार नाही असं नड्डा त्यांनी सांगितलं. क्षयरोगरुग्णांना आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ मिळत असल्याचंही ते यावेळी म्हणाले. या मोहिमेत क्षयरोगाचे नवीन रुग्ण शोधणं, गंभीर आजारी असलेल्या रुग्णांसाठी आधुनिक उपचार तसंच पोषक आहार देण्यावर भर देण्यात येणार आहे.

क्षयरोगाचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करून १०० दिवसांची विशेष मोहीम सुरू केल्यानं क्षयरोगाविरोधात देशाचा लढा अधिक बळकट झाला असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. क्षयरोग निर्मूलनासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

क्षयरोगनिर्मूलन मोहिमेला जिल्हा पातळीवरही आज प्रारंभ झाला.

**नांदेड** जिल्ह्यात तुप्पा प्राथमिक आरोग्य केंद्र इथं जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या हस्ते क्षयरोग निर्मूलन मोहिमेला सुरुवात झाली. **नंदुरबार** जिल्ह्यात जनजागृतीसाठी नि-क्षय वाहनाला हिरवा झेंडा दाखवून रॅली

काढण्यात आली. यावेळी सर्वांनी जागरूक राहून क्षयरोग मुक्त भारतासाठी योगदान देण्याची शपथ घेतली. या अंतर्गत अनाथाश्रम, वृद्धाश्रम, उद्योग संस्था, निवासी शाळा आणि कारागृहासह अनेक ठिकाणी क्षयरोग तपासणी करण्यात येणार आहे.

<><><><><>

सक्तवसुली संचालनालयानं आज अहमदाबाद आणि मुंबईत ७ ठिकाणांवर छापे टाकून साडे तेरा कोटी रुपयांची रोकड जप्त केली. बँक ऑफ महाराष्ट्र आणि नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत असलेल्या खात्यांद्वारे करण्यात आलेल्या डेबिट व्यवहारांच्या तपासात शेकडो कोटी रुपयांचे व्यवहार विविध कंपन्यांकडे हस्तांतरित करण्यात आल्याचं आढळलं आहे. तसंच विविध बनावट संस्थांच्या खात्यातून शेकडो कोटी रुपयांची रोकड काढून ती अहमदाबाद, मुंबई आणि सुरत इथं हवाला ऑपरेटर्सना वाटण्यात आली. नोव्हेंबरमध्ये नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मालेगाव शाखेवर या प्रकरणात टाकलेल्या छाप्यांच्या अनुषंगानं ही कारवाई करण्यात आली आहे.

<><><><><>

बालरंगभूमी परिषदेचं पहिलं बालरंगभूमी संमेलन २०, २१ आणि २२ डिसेंबर रोजी पुण्यात होणार आहे. या संमलेनाच्या अध्यक्षपदी चित्रपट-नाट्य अभिनेते मोहन जोशी असतील, संमेलनाचं उद्घाटन ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे यांच्या हस्ते होणार आहे. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष अभिनेत्री नीलम शिर्के-सामंत यांनी आज पुण्यात वार्ताहर परिषदेत ही

माहिती दिली. अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष, अभिनेते प्रशांत दामले, अभिनेते सयाजी शिंदे, दिग्दर्शक-अभिनेते सुबोध भावे यांच्यासह नाट्य आणि बालनाट्य क्षेत्रातले ज्येष्ठ कलाकार या संमेलनाला उपस्थित राहणार आहेत. बालकलाकारांची भव्य शोभायात्रा, विविध कलांचं, चित्ररथांचं प्रदर्शन, राज्यभरात गाजलेली बालनाट्यं, लोककलेचं सादरीकरण, दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या विविध संस्थांच्या बालकलावंतांचे कार्यक्रम यासह असंख्य विविध कार्यक्रम या संमेलनादरम्यान होणार आहेत. समारोपाच्या कार्यक्रमात ज्येष्ठ नाट्यकर्मी प्रतिभा मतकरी यांना बालरंगभूमी पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे.

**<><><><><>**

रत्नागिरीत आज युवा महोत्सव संपन्न झाला. क्रीडा आणि युवक सेवा संचालनालय, नेहरू युवा केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांनी संयुक्तरित्या हा महोत्सव आयोजित केला होता. या महोत्सवात युवकांच्या विविध कलागुणांना वाव देणाऱ्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या आणि विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

**<><><><><>**

बॉर्डर-गावस्कर करंडक क्रिकेट कसोटी मालिकेच्या दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ३३७ धावांवर आटोपला. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियानं भारतावर १५७ धावांची आघाडी घेतली आहे. आज दिवसअखेर भारताच्या दुसऱ्या डावात ५ बाद १२८ धावा झाल्या होत्या. पाच कसोटी सामन्यांच्या या मालिकेत सध्या भारत १-० नं पुढे आहे. पर्थ

इथं झालेल्या पहिल्या कसोटीत भारतानं ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी मोठा विजय मिळवला होता.

<><><><><>

कसोटी क्रिकेटच्या इतिहासात पाच लाख धावांचा टप्पा गाठणारा इंग्लंड हा जगातला पहिला संघ ठरला आहे. एकूण १ हजार ८२ सामने खेळून आणि ७१७ खेळाडूंच्या सहभागातून इंग्लंडने हा विक्रम नोंदवला आहे.

इंग्लंड संघाने १८७७ मध्ये ऑस्ट्रेलिया विरुद्ध पहिली कसोटी खेळली होती. जागतिक क्रिकेटमध्ये सर्वाधिक कसोटी सामने खेळणारा संघही इंग्लंड आहे.

कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक धावा करणाऱ्या संघांमध्ये दुसरा क्रमांक ऑस्ट्रेलिया संघाचा तर भारतीय संघाचा तिसरा क्रमांक लागतो. ऑस्ट्रेलिया संघाच्या ४ लाख, २८ हजार ८१६ धावा आहेत. ५८६ कसोटी सामने खेळलेल्या भारताने ३१६ खेळाडूंच्या सहभागातून २,लाख ७८ हजार,७५१ धावा केल्या आहेत.

<><><><><>

माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या पार्थिव देहावर आज अहिल्यानगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यात राजूर इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिचड यांचं अंत्यदर्शन घेऊन आदरांजली अर्पण केली. यावेळी आमदार राधाकृष्ण विखे पाटील,

आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार किरण लहामटे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्यासह समाजाच्या विविध क्षेत्रातल्या नागरिकांनी पिचड यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांना अखेरचा निरोप दिला.

**<><><><><>**

भारतीय सशस्त्र सेना दलांनी देश संरक्षणासाठी दाखवलेला पराक्रम कायम प्रेरणादायी आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सशस्त्र सेना ध्वज दिनानिमित दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. आजचा दिवस सशस्त्र सेना दलाच्या पराक्रमाचा आणि हौतात्म्याचा सन्मान करण्यासाठी पाळला जात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही भारतीय सैन्य दलाच्या धैर्य, पराक्रम, समर्पण आणि त्यागाला वंदन केलं. यानिमित्तानं देशवासीयांनी सशस्त्र सेना ध्वज निधीत योगदान द्यावं असं आवाहन प्रधानमंत्री आणि सरंक्षणमंत्र्यांनी केलं.

सशस्त्र सेना ध्वज दिनानिमित्त राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज राजभवनात सशस्त्र सेना ध्वज निधी संकलन मोहिमेचा प्रारंभ केला. सीमेवर जवान सजग पहारा देत असल्यामुळे देशात नागरिक सुखानं राहू शकतात आणि देश प्रगती करू शकतो. ही जाणीव ठेवून प्रत्येकानं सशस्त्र सैन्यदल ध्वजनिधीत योगदान दिलं पाहिजे, असं राज्यपाल म्हणाले. लातूर जिल्ह्यानं गेल्या वर्षी ध्वजदिन निधी संकलनात राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला. याबद्दल राज्यपालांच्या हस्ते लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांचा

गौरव करण्यात आला. हा निधी वीर जवानांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी तसंच सेवानिवृत्त जवानांच्या पुनर्वसनासाठी वापरला जातो.

**<><><><><>**

सांगली जिल्ह्याच्या काही भागात आज पहाटे जोरदार पाऊस झाला. यामुळे काही ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित झाला होता. काल मराठवाड्यात पावसानं सर्वत्र हजेरी लावली.

**<><><><><>**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत उल्लेखनीय तर कोकणात तुरळक ठिकाणी लक्षणीय वाढ नोंदवली गेली. राज्यात येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान कोरडं राहील तर विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**